# विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड

धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी, एच–ब्लॉक, 1 ला मजला,
ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई 400 710.

## जाहीर सूचना

**विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड (व्हीआयपीएल) आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड – डिस्ट्रीब्युशन (आरइन्फ्रा–डी) यांनी व्हीआयपीएलच्या 600 मेवॉ च्या बुटीबोरी प्रकल्पासाठी हंगामी प्रशुल्क निर्धारित करण्यासाठी सादर केलेल्या याचिकेवरील हरकती/ सूचना (प्रकरण क्र. 91 सन 2013)**

1. विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड (व्हीआयपीएल) आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड – डिस्ट्रीब्युशन (वीजवितरण व्यवसाय) (आरइन्फ्रा–डी) ह्यांनी **अर्जदाराच्या 600 मेवॉ च्या बुटीबोरी प्रकल्पाकरिता हंगामी प्रशुल्क निर्धारित करण्यासाठी** आर्थिक वर्ष (आव) 2014–15 आणि आव 2015–16 साठी महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगापुढे (एमईआरसी) वीज अधिनियम, 2003 च्या कलम 61 आणि 62 आणि 86(1)(ए)(बी) अंतर्गत आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोग (बहु वर्षीय प्रशुल्क – मल्टि इअर टॅरिफ) नियमावली 2011 च्या नियम 16, 24, 25 आणि 100 अंतर्गत एक याचिका दाखल केली आहे. एमईआरसीने ही याचिका मंगळवार, दिनांक 10 सप्टेंबर, 2013 रोजी दाखल करून घेतली आहे आणि वीज अधिनियम, 2003 च्या कलम 64(2) खाली एक जाहीर सूचना प्रकाशित करून त्याद्वारे जनतेकडून सूचना व हरकती निमंत्रित करण्याचे निर्देश व्हीआयपीएलला दिले आहेत.
2. या याचिकेतील ठळक बाबी पुढे दिलेल्या आहेत :

**तक्ता 1 : व्हीआयपीएलच्या बुटीबोरी प्रकल्पाकरिता प्रकल्प खर्च**

| अनु क्र. | तपशील | स्थापित क्षमता (मेवॉ) | प्रकल्प खर्च ₹ कोटी |
|---|---|---|---|
| 1 | व्हीआयपीएलचा बुटीबोरी प्रकल्प | 600 | 4063.05* |

*परिकल्पित भांडवली खर्च ₹4132 कोटी आहे. तथापि प्रशुल्क निश्चितीसाठी मूल्यऱ्हासित घटलेले मूल्य दि. 1 एप्रिल 2014 रोजी रु. 4063.05 कोटी असल्याचे प्रस्तावित आहे.

**तक्ता 2 : आव 2014–15 आणि आव 2015–16 साठी बुटीबोरी स्थानकासाठी वार्षिक स्थिर आकारणी**

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष 2014–15 ₹ कोटी | आर्थिक वर्ष 2015–16 ₹ कोटी |
|---|---|---|---|
| 1 | परिचालन आणि देखभाल खर्च | 105.00 | 111.00 |
| 2 | घसारा | 205.61 | 205.61 |
| 3 | दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | 321.54 | 300.42 |
| 4 | खेळत्या भांडवलावरील व्याज | 47.37 | 48.12 |
| 5 | आयकर | 40.88 | 40.88 |
| 6 | समभाग भांडवलावरील | 195.03 | 195.03 |
| 7 | परतावा वजा : इतर उत्पन्न | **0** | **0** |
| **8** | **वार्षिक स्थिर आकारणी** | **915.43** | **901.06** |

**तक्ता 3 : आव 2014–15 आणि आव 2015–16 साठी बुटीबोरी प्रकल्पाच्या बुटीबोरी स्थानकासाठी ऊर्जा आकारणी**

| इंधन | कॅलरीफिक मूल्य | विशिष्ट इंधन खप | किंमत | जनरेटर टर्मिनल खर्च (₹/kWh) | एक्स–बस ऊर्जा आकारणी (₹/kWh) |
|---|---|---|---|---|---|
| **आर्थिक वर्ष 2014-15** | | | | | |
| दगडी कोळसा (देशांतर्गत) | 4750 **(kcal/kg)** | 0.51 kg / kWh | 2017 **(₹/MT)** | | |
| दुय्यम इंधन – एफओ | 10400 **(kcal/L)** | 0.70 ml / kWh | 52994 **(₹/KL)** | | |
| दुय्यम इंधन – एलडीओ | 10700 **(kcal/L)** | 0.30 ml / kWh | 71058 **(₹/KL)** | | |
| **एकूण** | | | | **1.13** | **1.25** |
| **आर्थिक वर्ष 2015-16** | | | | | |
| दगडी कोळसा (देशांतर्गत) | 4750 **(kcal/kg)** | 0.51 kg / kWh | 2127 **(₹/MT)** | | |
| दुय्यम इंधन – एफओ | 10400 **(kcal/L)** | 0.70 ml / kWh | 55114 **(₹/KL)** | | |
| दगडी कोळसा (आयात) | | | | | |
| दुय्यम इंधन – एलडीओ | 10700 **(kcal/L)** | 0.30 ml / kWh | 73900 **(₹/KL)** | | |
| **एकूण** | | | | **1.20** | **1.32** |

**तक्ता 4 : बुटीबोरी स्थानकासाठी परिचालनीय परिमाणे**

| अनु क्र. | तपशील | नियमावलीनुसार निकष | मूल्य | | फरकासाठी कारणे |
|---|---|---|---|---|---|
| | | | आव 2014-15 | आव 2015-16 | |
| 1 | उपलब्धता (%) | 85% | 85% | 85% | |
| 2 | पीएलएफ (%) | 85% | 85% | 85% | |
| 3 | दुय्यम इंधन तेल खप (ml/kWh) | 1 | 1 | 1 | |
| 4 | साहाय्यक खप (%) | 9% | 9.13%* | 9.13 %* | |
| 5 | संक्रमण हानी (%) | 0.8% | 0.8% | 0.8% | |
| 6 | उष्णता दर (kcal/kWh)** | 1.065 x अभिकल्प उष्णता दर | 2450 | 2450 | |

*याचिकादाराने परिचालनीय आरक्षणापोटी रिव्हर्स ऑस्मॉसिस आणि वॉटर कन्व्हेअन्स प्रणालीसाठी (~0.13%) अतिरिक्त वीज खपासाठी विनंती केली आहे.
**अभिकल्प उष्णता दराची परिगणना संयत्राच्या अभिकल्प परिगणनेनुसार. व्हीआयपीएलने सध्या 2450 kcal/kWh चा उष्णता दर प्रस्तावित केलेला आहे.

**तक्ता 5 : बुटीबोरी स्थानकासाठी एकंदर निर्मिती आणि नक्त निर्मिती**

| तपशील | एकंदर निर्मिती (MU) | नक्त निर्मिती (MU) |
|---|---|---|
| आव 2014-15 | **4468** | **4060** |
| आव 2015-16 | **4480** | **4071** |

**तक्ता 6 : बुटीबोरी स्थानकासाठी प्रति युनिट स्थिर आकारणी आणि चल आकारणी (₹/kWh)**

| स्थानक | स्थिर आकारणी (FC) | चल आकारणी (VC[I]) | एकूण आकारणी (TC) |
|---|---|---|---|
| आव 2014-15 | 2.25 | 1.25 | 3.50 |
| आव 2015-16 | 2.21 | 1.32 | 3.53 |

[I] ₹. 0.5/kWh पाण्याच्या आकारणीसह

3. पुढील कागदपत्रांच्या प्रती लेखी विनंतीवरून विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड (व्हीआयपीएल) ह्यांच्या खाली नमूद केलेल्या कार्यालयांमधून मिळू शकतील :
   - अ. प्रस्तावांचा कार्यकारी सारांश (विनामूल्य, मराठी किंवा इंग्लिशमध्ये)
   - ब. तपशीलवार याचिका कागदपत्रे सीडी सह (इंग्लिशमध्ये) (₹.150/– रोख किंवा ''**विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड**'' ह्यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डीडी/चेकद्वारा भरल्यावर)
   - क. तपशीलवार याचिका कागदपत्रे (इंग्लिशमध्ये) (₹.100/– भरल्यावर)
   - ड. तपशीलवार याचिका कागदपत्रांची सीडी (इंग्लिशमध्ये) (₹. 50/– भरल्यावर)

**मुख्य कार्यालय :**
**व्यवसाय प्रमुख**
**विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड**
धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी, आय–ब्लॉक, 2 रा मजला, नॉर्थ विंग,
ठाणे बेलापूर रस्ता, कोपरखैरणे, नवी मुंबई 400 710.

**कार्यालये :**

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी/ फॅक्स क्र. |
|---|---|---|
| कार्यालय | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड,धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी, आय–ब्लॉक, 2 रा मजला, नॉर्थ विंग, ठाणे बेलापुर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई 400 710. | दूरध्वनी : +91-22-3038 6600<br>फॅक्स : +91-22-3038 6999/6799 |
| नोंदणीकृत कार्यालय | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड, एच ब्लॉक, 1ला मजला, धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी, ठाणे बेलापुर रोड,कोपरखैरणे, नवी मुंबई 400 710. | दूरध्वनी : +91-22-3038 6600<br>फॅक्स : +91-22-3038 6999/6799 |
| नागपुर कार्यालय | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड, रिलायन्स पॉवर लिमिटेड, 11, दागा लेआऊट, नॉर्थ अम्बाझरी रोड, नागपुर 440 010 | दूरध्वनी : +91-7104-305607<br>फॅक्स : +91-7104-305720 |
| नागपुर साईट कार्यालय | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड, रिलायन्स पॉवर लिमिटेड, डी–3, एमआयडीसी इंडस्ट्रिअल एरिया, बुटीबोरी, नागपुर 441 122 | दूरध्वनी : +91-7104-305607<br>फॅक्स : +91-7104-305720 |
| कार्यालय | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड,7 वा मजला, देवीदास लेन, राम मंदिर जवळ, बोरिवली (प), मुंबई 400 092 | दूरध्वनी : +91-22-3009 9999<br>फॅक्स : +91-22-3009 8799 |
| नोंदणीकृत कार्यालय | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, एच ब्लॉक, 1ला मजला, धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी, ठाणे बेलापुर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई 400 710. | दूरध्वनी : +91-22-3038 6101<br>फॅक्स : +91-22-3037 6622/6623 |

4. आयोगाने व्हीआयपीएल ह्यांना वरील याचिकेवर ह्या सूचनेद्वारा जनतेकडून हरकती/ सूचना मागविण्याचे निर्देश दिलेले आहेत. सूचना/हरकती सचिव, महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, 13 वा मजला, सेंटर क्र.1, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई–400 005 (फॅक्स : 22163976 ई–मेल : mercindia@mercindia.org.in) ह्यांना **बुधवार दिनांक 9 ऑक्टोबर 2013** पर्यंत, व्हीआयपीएल ह्यांना प्रत दिल्याच्या पुराव्यासह पाठवाव्यात.
5. हरकती/ सूचना दाखल करू इच्छिणारी प्रत्येक व्यक्ती त्या इंग्लिशमध्ये किंवा मराठीमध्ये, सहा प्रतींमध्ये सादर करू शकते आणि त्यावर प्रेषकाचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि असल्यास ई–मेल पत्ता असणे आवश्यक आहे. हरकती/ सूचना एखाद्या संस्थेच्या वतीने किंवा ग्राहकांच्या एखाद्या संवर्गाच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे निर्देशित करणे आवश्यक आहे. प्रेषकाला आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास तसे नमूद करणेही आवश्यक आहे जेणेकरून त्याला तशी संधी आयोगातर्फे **गुरुवार दिनांक 17 ऑक्टोबर 2013 रोजी सकाळी 11.30 वाजता सेंट्रम हॉल, 1 ला मजला, सेंटर क्र.1, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई–400 005 येथे आयोजित जाहीर सुनावणीच्या वेळी दिली जाईल,** ज्यासाठी कोणतीही स्वतंत्र सूचना दिली जाणार नाही.
6. व्हीआयपीएल, प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकतीला आणि सूचनेला ती प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत पण सोमवार, दिनांक 14 ऑक्टोबर 2013 रोजी, पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकती आणि सूचनांना बुधवार दिनांक 09 ऑक्टोबर, 2013 रोजी, नंतर नव्हे, उत्तर देईल. व्हीआयपीएल ने दिलेल्या उत्तरांवर हितसबंधी लोक उत्तरावरील त्यांचा प्रतिसाद जाहीर सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात उशीरा सोमवार, दिनांक 21 ऑक्टोबर 2013 रोजी, पर्यंत सादर करू शकतात.
7. तपशीलवार याचिका कागदपत्रे आणि सारांश www.reliancepower.co.in ह्या व्हीआयपीएलच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत आणि कार्यकारी सारांश आयोगाच्या www.merc.gov.in / www.mercindia.org.in ह्या संकेतस्थळावरही डाऊनलोड करता येण्यासारख्या स्वरूपात (विनामूल्य) उपलब्ध आहे.

सही :
नाव : रामचंद्र गारलादेन्ने
हुद्दा : उपाध्यक्ष
**व्यवसाय प्रमुख**
**विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड**